☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्र. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 280 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 15 / 07 / 2025

# 1)घरफोडी :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 10.07.2025 रोजी 08.30 वा. ते दिनांक 14.07.2025 रोजी 09.00 वा.चे दरम्यान, **पद्मजा सिटी, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे बहिण व भावजी बाहेर गावी गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून घरातील कपाटाचे लॉकर मधील नगदी 1,00,000/–रू व सोन्याचे दागिने किंमती 75,000/–रू चा मुद्देमाल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी अपूर्व अंबाप्रसाद वशिष्ठ, वय 32 वर्षे, व्यवसाय नौकरी** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 672/2025 कलम 331(3),331(4), 305(अ) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/चव्हाण, मो. नं.**9730626514 हे करीत आहेत.

# 2)अवैध रेती चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 14.07.2025 रोजी 19.45 वा. चे सुमारास, **विष्णुपूरी पुलाजवळ रोडवर नांदेड येथे,** आरोपी नामे रामदास काळबा तारू, वय 45 वर्षे, व्यवसाय चालक रा. नागापूर ता. जि. नांदेड हा टाटा टिप्पर क्रमांक एमएच–26/एडी–2315 किंमत 2,00,000/–रू मध्ये तीन ब्रास रेती किंमत 15,000/–रू विना परवाना बेकायदेशिररित्या चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने वाहतूक करीत असतांना मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2606 माधव परसराम डफडे, नेमणूक पोस्टे नांदेड ग्रामीण** यांचे फिर्यादीवरून **पोस्टे नांदेड ग्रामीण गुरनं 674/2025** कलम 303(2),221 बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2445 शिंदे, मो. नं.**9730626514 हे करीत आहेत.

# 3)भारतीय हत्यार कायदा :–

**शिवाजीनगर :– मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी **स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत स्ट्रिट सेफ्टी पथक आणि शहरातील सर्व पोलीस स्टेशन यांना भारतीय हत्यार कायदा अन्वये कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते.** त्या अनुषंगाने दिनांक 14.07.2025 रोजी 18.00 वा. चे सुमारास, **फायर स्टेशनच्या पाठीमागे आंबेडकर नगर, नांदेड येथे,** यातील आरोपी नामे सुदर्शन संजय गायकवाड, वय 24 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. आंबेडकर नगर नांदेड हा विना परवाना बेकायदेशिररित्या एक लोखंडी तलवार किंमत 500/–रू ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1542 पदमसिंह देवीदास कांबळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 289/2025 कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2753 शेख, मो.क्रं.** 9923799345 हे करीत आहेत.

# 4)जुगार :–

**1)इतवारा :–** दिनांक 14.07.2025 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **हनुमान मंदिराचे बाजुस इतवारा नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. निरीषसिंह सुंदरसिंह तेहरा, वय 39 वर्षे, रा. लेबर कॉलनी नांदेड 2. मोहन मोतीसिंह बैस, वय 23 वर्षे, रा. गाडीपूरा इतवारा हे विना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 3120/–रु व जुगाराचे साहित्यासह मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1544 सुरज सयाराम परसुरे, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 246/2025 कलम 12(अ) म.जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/925 कोंडेकर, मो.क्रं. 7709556648** हे करीत आहेत.

**2)मुदखेड :–** दिनांक 14.07.2025 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **मुदखेड ते भोकर जाणारे रोडवर, नवी आबादी मुदखेड ता. मुदखेड जि.नांदेड येथे,** यातील आरोपी नामे शेख सदाम शेख महेबुब, वय 30 वर्षे, रा. नवी आबादी मुदखेड विना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण व मिलन नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2990/–रु व जुगाराचे साहित्यासह मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3021 अरविंद व्यंकटराव शिंगारपुतळे, ने. पोस्टे मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 126/2025 कलम 12(अ) म.जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/1375 ठाकूर, मो.क्रं. 7774051375** हे करीत आहेत.

## 5)प्रोव्हिबिशन :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 13.07.2025 रोजी 22.00 वा. सुमारास, **ढवळे कॉर्नर रोडवर नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. विठ्ठल बळवंतराव उपासे, वय 21 वर्षे, 2. वसंत मारोती शिंदे, वय 19 वर्षे, दोघे रा. पळसगाव ता. नायगाव हे विना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमत 2400/–रू, एक विना नंबर युनिकॉन मोटार सायकल किंमत 90,000/ –रू व दोन मोबाईल फोन किंमत 25,000/–रू असा एकुण किंमत 1,17,400/–रूपयाचे मुद्देमाला सह मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/492 संतोष रघुनाथ जाधव, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 670/2025 कलम 65(ई), म.प्रो.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2141 मोरे,** मो.नं. 9011900345 हे करीत आहेत.

## 6)विषारी औषध पिवून शेतकरी आत्महत्या :–

**मनाठा :–**दिनांक 14.07.2025 रोजी 10.30 वा. चे सुमारास, **मौ.खरबी ता.हदगाव जि.नांदेड येथे,** यातील **मयत नामे चांदू शिवाजी खांदोडे, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा.खरबी ता. हदगाव जि.नांदेड** यांनी शेतीच्या सततची नापिकीला व शेतीसाठी घेतलेले कर्जाला कंटाळून शेतात कोणतेतरी विषारी औषध पिवून मरण पावले. वगैरे **खबर देणार राघोजी शिवाजी खांदोडे, वय 25 वर्षे, व्यवसाय शेती रा. खरबी ता.हदगाव जि.नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून **पोस्टे मनाठा आ. मृ. 20/2025** कलम 194 बीएनएस–2023 कायदा प्रमाणे दाखल असुन **तपास पोउपनि/इंगोले, मो.नं. 9764905142** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड